// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**Maharashtra State Commission for Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 2707
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Toll Free No. 155209
E-mail : mscwmahilaayog@gmail.com


क्रमांक :- ममआ-२०२६/संकेतस्थळ/का-६/639
दिनांक :- २२/४/२०२६.

## नोटीस

विषय :- राज्य महिला आयोग कार्यालयाच्या संकेतस्थळाची वार्षिक देखभाल व दुरुस्तीसाठी तसेच संकेतस्थळ होस्टिंगसाठी निविदा मागविणेबाबत.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयाच्या www.mscw.org.in या संकेतस्थळाच्या वार्षिक देखभाल व आवश्यक ते अंतर्गत बदल करण्यासाठी तसेच संकेस्थळाच्या होस्टिंगसाठी दरकरार करावयाचा आहे. त्यासाठी नामांकित कंपन्यांकडून निविदा मागविण्यात येत असून इच्छूक असणा-या निविदाधारकाने आपली निविदा स्वत:च्या लेटरहेडवर आयोग कार्यालयास सादर करावीत. सदर निविदेमध्ये रक्कम रुपये, G.S.T. No. व लागू कर आकारणी स्वतंत्ररित्या दर्शविण्यात यावी. तसेच नोटीस संदर्भाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

**संकेतस्थळ देखभाल व दुरुस्तीसाठी खालील बाबींचा समावेश असावा :-**

१. संकेतस्थळ होस्टिंग हे VPS / क्लाऊड आधारित भारतीय सर्व्हरवर असावे, ज्यामध्ये किमान ६ CPU कोअर्स व ६ GB RAM असणे आवश्यक आहे.
२. SSL प्रमाणपत्राचा समावेश असणे बंधनकारक आहे.
३. योग्य CDN (Content Delivery Network) चा वापर करण्यात यावा.
४. होस्टिंग प्लॅनमध्ये नियमित बॅकअपची सुविधा असावी.
५. संकेतस्थळावरील नियमित मजकूर व छायाचित्र अद्ययावत करणे तसेच आवश्यकतेनुसार नवीन पृष्ठे तयार करणे हे देखभाल कामात समाविष्ट आहे.
६. दरमहा संकेतस्थळ कोडचे परीक्षण करुन, उद्भवणा-या त्रुटी (bugs) तात्काळ दुरुस्त करणे आवश्यक आहे.
७. संकेतस्थळ नेहमी वापरकर्त्यास सुलभ (user friendly) राहील याची दक्षता घ्यावी.
८. संकेतस्थळ मोबाईसाठी अनुकूल (Mobile responsive) असणे आवश्यक आहे.

९. आयोगाच्या निर्देशानुसार भविष्यात संकेतस्थळाशी तक्रार निवारण पोर्टल, चॅटबॉट सेवा जोडणेबाबत कार्यवाही करावी लागेल.

**सादर करावयाची कागदपत्रे :-**

१. कंपनी नोंदणी प्रमाणपत्र (Company Certificate).

२. GST नोंदणी प्रमाणपत्र

३. PAN कार्डची प्रत

४. मागील दोन वर्षाचे लेखापरीक्षण ताळेबंद (Audited Balance Sheet) व आयकर विवरणपत्र (ITR)

५. मागील तीन वर्षामध्ये कोणत्याही शासकीय संस्थेसाठी संकेतस्थळ देखभाल कार्य केले असल्यास अनुभव प्रमाणपत्र तसेच संबंधित कार्यादेश (Work Order) सादर करावे.

सदर निविदा दिनांक ३०/४/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत आयोग कार्यालयास सिलबंद लिफाफ्यात सादर करावयाची आहेत. प्राप्त झालेली दरपत्रके त्याच दिवशी दुपारी ०३.०० वाजता उघडण्यात येतील. त्यावेळी संबंधित कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधींनी आयोग कार्यालयात उपस्थित रहावे. सदर प्रक्रियेबाबत कोणताही बदल किंवा रद्द करण्याचा पूर्ण अधिकार मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचेकडे राहील. याची कृपया नोंद घ्यावी.

प्रशासकीय अधिकारी

ठिकाण :- वांद्रे, मुंबई